# रचनावादी शिक्षणप्रणाली
# रमेश पानसे अभ्यासवर्ग

## रचनावादी शिक्षणप्रणाली

ज्ञानरचनावादी किंवा रचनावादी शिक्षण (Constructivism) हा अलीकडच्या शिक्षणशास्त्रांत आणि शिक्षणव्यवहारांत अगदी परवलीचा शब्द होऊन बसला आहे. जगभर गेल्या साठ वर्षात पूर्वीच्या वर्तनवादी विचारसरणीचे उच्चाटन होत गेले आहे आणि या नव्या प्रणालीमुळे शिक्षणव्यवहार शिकणारा–शिकवणाऱ्यांसाठी अधिक आनंदाचा व अधिक गुणवत्तेचा होत असल्याचे प्रत्ययाला आले आहे.

भारतात २००५ साली केंद्र शासनाने ' राष्ट्रीय शिक्षणक्रम' आराखडा ' (National Curriculum Framework) प्रकाशित करून शिक्षण रचनावादी पध्दतीने करण्याची दिशा दिली. २००९ साली झालेल्या ' बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणा 'च्या कायद्यातही रचनावादी शिक्षणपध्दतीचा आग्रह धरण्यात आला आहे.

'महाराष्ट्रात २०१० साली या कायद्याचा स्वीकार करून, शासनाने या दिशेने पावले उचलण्यास सुरूवात केली. क्रमिक पुस्तकांमध्ये बदल करीत जाणे, अधिकारीवर्ग व शिक्षक–शिक्षिका यांचे याबाबतींतले प्रशिक्षण करणे यातून शिक्षण रचनावादी करण्याकडे वाटचाल केली आहे. यानंतरच्या पाच वर्षामध्ये मुख्यत: ग्राममंगलच्या प्रयोगांतून, प्रेरणेतून व उभ्या राहिलेल्या नमुन्यातून वाई, सातारा येथील शिक्षणाधिकारी व अनेक शाळांनी रचनावादी शिक्षणपध्दती यशस्वी रितीने व्यवहारात आणली. त्यांतून विद्यार्थी आनंदात आणि वेगाने कशी शिकतात, ही पध्दत सार्वत्रिकरित्या कशाप्रकारे राबविता येते, याचे प्रत्यंतर आले.

महाराष्ट्र शासनाने २२ जून २०१५ रोजी ' प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र ' घडविण्यासाठी एक शासन निर्णय जारी केला व महाराष्ट्रभरच्या प्राथमिक शाळांतून रचनावादी शिक्षण प्रणालीचे वारे वाहू लागले. अनेक शिक्षकांनी स्वत: प्रेरित होऊन शिक्षणात बदल करण्यास सुरूवात केली. आणि त्यांतून विद्यार्थी उत्तम तऱ्हेने शिकतात याचा अनुभव घेण्यास सुरूवात केली. जिल्हा परिषदांच्या शाळांनी कात टाकायला आणि शिक्षणाच्या दृष्टीने अधिक चमकदार कामगिरी करण्यास सुरूवात केली आणि याचा पालकवर्ग व गावकरी यांच्यावर प्रभाव पडून त्यांच्या मदतीने शाळाच अधिक दर्जेदार होऊ लागल्या आहेत. या अनुभवांतून, महाराष्ट्र शासनाने, १६ सप्टेंबर २०१६ रोजी ' प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र ' (माध्यमिक स्तर ) असा नवा शासननिर्णय जारी केला.महाराष्ट्रात तरी या शासकीय पुढाकाराने, प्राथमिक व माध्यमिक स्तरांवरील म्हणजे शालेय शिक्षणातच परिवर्तनाची पावले वेगाने पडू लागली आहेत !

## रचनावादी शिक्षणप्रणाली

हे ज्ञानरचनावादी शिक्षण नेमके काय आहे ? गेल्या साठ वर्षांमध्ये शिक्षणाला आधारभूत असणाऱ्या शास्त्रांमध्ये का व कसकसे बदल होत गेले ? या बदलांमुळे शिक्षण शास्त्रालाच वेगळे वळण कसे मिळू लागले ? मज्जा–मानसशास्त्रांतील नव्या संशोधनांमुळे सारे शिक्षणशास्त्र का ढवळून निघाले? मुले शिकतात कशी? त्यांच्या शिकणाच्या नैसर्गिक प्रक्रिया कशा असतात? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता, शिक्षणव्यवहाराशी प्रत्यक्षपणे संबंधित असणाऱ्यांना म्हणजे शिक्षक, पालक व विविध स्तरांवरील शिक्षणाधिकारी यांना माहीत असण्याची गरज निर्माण झाली आहे. अनेक नव्या संकल्पना आता शिक्षणात प्रचलित होऊ लागल्या आहेत.मेंदूआधारित शिक्षण, बहुविध बुध्दिमत्ता,मानसप्रतिमा, शिक्षणसंक्रमण, 'मेंदूमधील घसरण, स्वयंशिक्षण, कृतिशील शिक्षण अशा अनेक संकल्पना पुढे येऊन ' रचनावादी शिक्षणशास्त्र' नावाचे नवे शिक्षणशास्त्रच उदयाला आले आहे.मन मेंदू व शिक्षण यांची सांगड घालून शालेय वर्गामधील दैनंदिन शिक्षणव्यवहार पूर्णपणे नवे व अत्यंत विद्यार्थीभिमुख असे स्वरूप प्राप्त करू लागला आहे.

या सगळ्यांचे आकलन करून घेण्याची संधी, प्रा. रमेश पानसे यांच्या अभ्यासवर्गांतून यापूर्वी अनेक शिक्षणाधिकारी व प्रेरित शिक्षकांनी घेऊन, आपापल्या स्तरांवर शिक्षणात कालसुसंगत असे बदल करण्यास सुरूवात केली आहे. प्रा. रमेश पानसे यांचे दोन दीर्घकालिक असे वर्ग यापूर्वी पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. याला अधिकारी वर्ग व शिक्षकवर्ग यांचा मिळालेला भरघोस प्रतिसाद म्हणजे, अशा अभ्यास वर्गाची गरजच अधोरेखित करणारा आहे.

ग्राममंगल संस्थेने ' रचनावादी शिक्षणप्रणाली ' या विषयावरील शिक्षणक्रम तयार केला आहे. हा शिक्षणक्रम आधुनिक शिक्षणाच्या शास्त्रीय पायांवर आधारलेला आहे. आपल्या शाळा–शाळांतून आणि महाविद्यालयांतून चाललेल्या वर्तनवादी शिक्षणात परिवर्तन करून विद्यार्थ्यांना ताणरहित, आनंदी वातावरणात शिकण्याची संधी मिळायची असेल तर आता नवीन शिक्षणाला डावलून चालणार नाही.

हा अभ्यासक्रम एकूण पूर्ण चोवीस दिवसांचा असून त्याची विभागणी प्रत्येकी बारा दिवसांच्या दोन शिक्षणक्रमांत केली आहे. शिक्षणक्रमाचा पहिला बारा दिवसांचा भाग हा पहिल्या स्तरावरचा प्रमाणपत्र अभ्यासवर्ग (Certificate Course) आहे. हा वर्ग पूर्ण करणारे, पुढील बारा

दिवसांच्या अधिक उच्च स्तरावरच्या प्रमाणपत्र अभ्यासवर्गाला नावे नोंदवू शकतील. हे वर्ग पूर्ण करणाऱ्यांना, त्या त्या स्तरावरचे प्रमाणपत्र प्राप्त होईल. यांपैकी पहिल्या स्तरावरील अभ्यासवर्ग, ग्राममंगल संस्था ही २०१७-१८ या वर्षात सुरू करीत आहे.
उच्चविद्या विभुषित, अनुभवी आणि सैध्दांतिक व व्यावहारिक रचनावादी शिक्षणप्रणालीत तज्ज्ञता प्राप्त केलेला असा सहाय्यक गट या वर्गांसाठी उपलब्ध आहे. यामध्ये ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. रमेश पानसे हे स्वतः सहभागी असणार आहेत. त्यांच्या बरोबर, सुषमा पाध्ये, अदिती नातू, प्रसाद मणेरीकर, डॉ. वर्षा कुलकर्णी, डॉ. दिनेश नेहेते, अश्विनी गोडसे व नीतू पंडित ही नव्या शिक्षणातील अनुभवी तज्ज्ञ मंडळी असणार आहेत.

# रमेश पानसे अभ्यासवर्ग

## उद्दिष्टे

- ज्ञानरचनावादी शिक्षणाची सैध्दांतिक व व्यावहारिक संकल्पना स्पष्ट होणे.
- ज्ञानरचनावादी शिक्षणामागील सैध्दांतिक पार्श्वभूमीची ओळख होणे.
- आकलनशास्त्र, मन - मेंदू - शिक्षण शास्त्र या, रचनावादी शिक्षणाचा पाया असणाऱ्या शास्त्रांची ओळख होणे.
- मेंदू आधारित शिक्षणाचे, त्यातील तत्त्वांचे आकलन होणे.
- रचनावादी शिक्षणाची तत्त्वे आकलन होणे.
- शिकणारे मूल वयोमानानुसार समजणे व त्यांचा अध्ययन व्यवहार आकलन होणे.
- रचनावादी शिक्षणाचा प्रत्यक्ष व्यवहार वर्ग, शाळा स्तरांवर माहीत होणे, वापरता येणे.

## अभ्यासक्रम

- वर्तनवादी विचारसरणी
- आकलनवादी विचारसरणी
- रचनावादी विचारसरणी
- रचनावादी दृष्टिकोण
- रचनावादी शिक्षणाचे आधार - १
- मेंदूतील शिकण्याची प्रक्रिया
- मेंदूसंशोधनातील शिक्षणउपयुक्त संकल्पना
- मेंदूआधारित शिक्षणाची तत्त्वे
- बुध्दिमत्तेचा विचार
- रचनावादी शिक्षणास उपयुक्त अवजारे
- रचनावादी शिक्षणास उपयुक्त तंत्रे
- रचनावादी शिक्षणास उपयुक्त संकल्पना
- रचनावादी शिक्षण व सकलशाळा दृष्टिकोण
- लोकशाहीतील नागरिकत्त्वाचे शिक्षण व मूल्यांची रूजवणूक, जपणूक व संवर्धन
- रचनावादी शिक्षकाची भूमिका
- मध्यमवय व माध्यमिक शिक्षण

## प्रशिक्षणात वापरल्या जाणाऱ्या पध्दती

- व्याख्यान
- स्वयंकृती
- गटकार्य
- चर्चा
- पूरक वाचन
- लेखनपाठ
- दृक श्राव्य माध्यम
- निबंधलेखन
- प्रत्यक्ष उपक्रमात भाग
- प्रशिक्षणात सहभाग

पहिला वर्ग ठाणे येथे, पुढील तारखांना घेण्यात येईल.
१९, २० ऑगस्ट २०१७,
२, ३ आणि १६,१७ सप्टेंबर २०१७,
१, २ ऑक्टोबर २०१७,
४, ५ आणि २५, २६ नोव्हेंबर २०१७,
या वर्गासाठी नोंदणी करणाऱ्यांसाठी, तसेच ग्राममंगलच्या सर्व कार्यालयांतून / ग्राममंगलच्या वेबसाईटवर प्रवेशपत्र उपलब्ध केले आहे. ते भरून, या अभ्यासवर्गासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी १० ऑगस्ट २०१७ पर्यंत व्हावी लागेल. जे नोंदणी करतील त्यांना अभ्यासवर्गाचा पत्ता त्यांच्या इमेलवर लवकरच कळविण्यात येईल.

हा वर्ग अनिवासी असून संपूर्ण वर्गाचे शुल्क प्रत्येकी १५०००/- रूपये इतके आहे. हे शुल्क संपूर्णपणे नोंदणी बरोबरच भरावयाचे आहे. प्रत्येक अभ्यासघटकाला पूरक असे काही संदर्भसाहित्य वर्गात दिले जाईल. हा वर्ग पूर्ण करणारांना वर्गाअखेरीस प्रमाणपत्र देण्यात येईल.

संपर्कासाठी :
पुणे कार्यालय- गांधी भवन, अंध मुलींच्या शाळेशेजारी, कोथरूड, पुणे - ४११०३८, दूरध्वनी : ०२० - २५३८६६८७
Email : info@grammangal.org, Website : www.grammangal.org

# रचनावादी शिक्षणप्रणाली
# रमेश पानसे अभ्यासवर्ग

## उद्दिष्टे

- ज्ञानरचनावादी शिक्षणाची सैध्दांतिक व व्यावहारिक संकल्पना स्पष्ट होणे.
- ज्ञानरचनावादी शिक्षणामागील सैध्दांतिक पार्श्वभूमीची ओळख होणे.
- आकलनशास्त्र, मन - मेंदू - शिक्षण शास्त्र या, रचनावादी शिक्षणाचा पाया असणाऱ्या शास्त्रांची ओळख होणे.
- मेंदू आधारित शिक्षणाचे, त्यातील तत्त्वांचे आकलन होणे.
- रचनावादी शिक्षणाची तत्त्वे आकलन होणे.
- शिकणारे मूल वयोमानानुसार समजणे व त्यांचा अध्ययन व्यवहार आकलन होणे.
- रचनावादी शिक्षणाचा प्रत्यक्ष व्यवहार वर्ग, शाळा स्तरांवर माहीत होणे, वापरता येणे.

## अभ्यासक्रम

- वर्तनवादी विचारसरणी
- आकलनवादी विचारसरणी
- रचनावादी विचारसरणी
- रचनावादी दृष्टिकोण
- रचनावादी शिक्षणाचे आधार - १
- मेंदूतील शिकण्याची प्रक्रिया
- मेंदूसंशोधनातील शिक्षणउपयुक्त संकल्पना
- मेंदूआधारित शिक्षणाची तत्त्वे
- बुध्दिमत्तेचा विचार
- रचनावादी शिक्षणास उपयुक्त अवजारे
- रचनावादी शिक्षणास उपयुक्त तंत्रे
- रचनावादी शिक्षणास उपयुक्त संकल्पना
- रचनावादी शिक्षण व सकलशाळा दृष्टिकोण
- लोकशाहीतील नागरिकत्त्वाचे शिक्षण व मूल्यांची रूजवणूक, जपणूक व संवर्धन
- रचनावादी शिक्षकाची भूमिका
- मध्यमवय व माध्यमिक शिक्षण

## प्रशिक्षणात वापरल्या जाणाऱ्या पध्दती

- व्याख्यान
- स्वयंकृती
- गटकार्य
- चर्चा
- पूरक वाचन
- लेखनपाठ
- दृक श्राव्य माध्यम
- निबंधलेखन
- प्रत्यक्ष उपक्रमात भाग
- प्रशिक्षणात सहभाग

पहिला वर्ग ठाणे येथे, पुढील तारखांना घेण्यात येईल.
१९, २० ऑगस्ट २०१७,
२, ३ आणि १६,१७ सप्टेंबर २०१७,
१, २ ऑक्टोबर २०१७,
४, ५ आणि २५, २६ नोव्हेंबर २०१७,
या वर्गासाठी नोंदणी करणाऱ्यांसाठी, तसेच ग्राममंगलच्या सर्व कार्यालयांतून / ग्राममंगलच्या वेबसाईटवर प्रवेशपत्र उपलब्ध केले आहे. ते भरून, या अभ्यासवर्गासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी १० ऑगस्ट २०१७ पर्यंत व्हावी लागेल. जे नोंदणी करतील त्यांना अभ्यासवर्गाचा पत्ता त्यांच्या इमेलवर लवकरच कळविण्यात येईल.

हा वर्ग अनिवासी असून संपूर्ण वर्गाचे शुल्क प्रत्येकी १५०००/– रूपये इतके आहे. हे शुल्क संपूर्णपणे नोंदणी बरोबरच भरावयाचे आहे. प्रत्येक अभ्यासघटकाला पूरक असे काही संदर्भसाहित्य वर्गात दिले जाईल. हा वर्ग पूर्ण करणारांना वर्गाअखेरीस प्रमाणपत्र देण्यात येईल.

संपर्कासाठी :
पुणे कार्यालय– गांधी भवन, अंध मुलींच्या शाळेशेजारी, कोथरूड, पुणे – ४११०३८, दूरध्वनी : ०२० – २५३८६६८७
Email : info@grammangal.org, Website : www.grammangal.org